ePaper

'सीटबेल्ट'साठी सज्जता, मोटारीतील बदलांसाठी आज अखेरचा दिवस



| वर्ष - 6 । अंक - 197 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- पुण्यात शिंदे गटाकडून बॅनरबाजी
- पिंपरी-चिंचवडमध्ये छटपूजा उत्साहात
- लोकांचे आर्थिक प्रश्न नजरेआडच?


www.mahaenews.com | ।सोमवार ।दिनांक 31 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'काळ्या काचा' वाहन मालकांना 'झटका'

## कारवाई मोहीम : वाहतूक शाखेकडून 2.31 कोटींचा दंड वसूल

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने काळ्या काचा असलेल्या चारचाकी वाहनांवर कारवाई करून 2.31 कोटी दंड वसूल केला आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त आनंद भोईटे यांनी दिली आहे.

वाहनांच्या काचा या पारदर्शक असाव्यात, असा नियम आहे. पण, काही वाहन चालक हा नियम भंग करून आपल्या चार चाकी वाहनाच्या काचांना गडद काळ्या रंगाच्या फिल्म चिकटवतात. अशा नियम भंग करणाऱ्या वाहन चालकांविरोधात पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने विशेष मोहिम राबवून मागील 10 महिन्यात 1 जानेवारी ते 27 ऑक्टोबर 2022 पर्यंत 2 कोटी 31 लाख 13 हजार 500 रुपये दंड वसूल केला आहे. हा दंड 23,944 वाहनांवर कारवाई करून वसूल करण्यात आला आहे.

वाहतूक विभागाने 28 ऑक्टोबर रोजी विशेष मोहीम राबवून काळा काचा असलेल्या चार चाकी वाहनांवर कारवाई केली आहे. या मोहिमेत 422 चार चाकी वाहनांवर कारवाई करून 3 लाख 48 हजार 600 रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. भोसरी वाहतूक पोलिसांकडून सर्वाधिक 100 वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. या भावनांच्या वाहन चालकांकडून 79,000 रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.





### भोसरीत सर्वाधिक कारवाई

**शुक्रवारी वाहतूक शाखेकडून करण्यात आलेल्या कारवाईमध्ये भोसरी वाहतूक पोलिसांकडून सर्वाधिक 100 वाहनांवर कारवाई करण्यात आली. कारवाई करण्यात आलेल्या वाहनचालकांकडून तब्बल 79 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.**

| वाहतूक विभाग | केसेस | दंड (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| सांगवी | 49 | 39,600 |
| हिंजवडी | 27 | 17,500 |
| निगडी | 30 | 26,000 |
| चिंचवड | 19 | 16,500 |
| पिंपरी | 19 | 17,500 |
| भोसरी | 100 | 79,000 |
| चाकण | 38 | 29,000 |
| देहूरोड | 45 | 42,500 |
| दिघी-आळंदी | 11 | 8,500 |
| तळवडे | 21 | 16,500 |
| वाकड | 28 | 26,500 |
| तळेगाव | 17 | 17,500 |
| महाळुंगे | 18 | 12,000 |
| एकूण | 422 | 3,48,600 |

# इंद्रायणी घाटावर छठ पूजेचा भक्तीसागर !

## शहरातील 17 घाटांवर पूजा : गंगा आरतीचे आयोजन

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

उद्योगनगरी पिंपरी चिंचवडमध्ये आज छठ महापूजा साजरी करण्यात आली. शहरातील एकूण 17 घाटांवर श्रद्धा, पूजा आणि भक्तीमय वातावरणात छठपूजा साजरी करण्यात आली. मोशी येथील इंद्रायणी नदी घाटावर छठ पूजा उत्सवानिमित्त महाकुंभ संपन्न झाला. काशी गंगा आरतीचे अद्भूत दृश्य पाहण्यासाठी भाविकांचा महासागर उसळला होता.



यावेळी विश्व श्री राम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.लालबाबू गुप्ता यांच्या विशेष निमंत्रणावरून 1008 महामंडलेश्वर स्वामी प्रणवानंद सरस्वती महाराज, सुदर्शन टीव्हीचे प्रमुख व राष्ट्र निर्माण संस्थेचे संस्थापक सुरेश चव्हाणके, श्यामजी महाराज, पुणे विद्यापीठाचे सदस्य राजेश पांडे उपस्थित होते. या घाटावर एकूण 100 छठ मातेच्या बेद्या करण्यात आल्या होत्या. लाइफ गार्ड, रुग्णवाहिका, 3 बोटी, पोलीस सुरक्षा दल कानाकोपऱ्यात तैनात होते. ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवण्यात आली. आळंदीतून वारकरी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग शिवले, सचिव संयाराम हिवराळे, खजिनदार बालवधूत, योगी गणेश आदी उपस्थित होते. त्यांच्यासोबत मर्दानी काठ्या, तलवारबाजीची कलाबाजी होती.

सर्व मान्यवरांनी हिंदू धर्माला पुढे नेण्यासाठी, बळकट करण्यासाठी, हिंदु राष्ट्राच्या उभारणीसाठी संघटित होऊन ताकद दाखवण्याचे आवाहन केले. चव्हाणके म्हणाले की, बिहारची जनता देशात असो वा परदेशात आपली संस्कृती सोबत घेऊन जाते. पर्यावरण वाचवणे म्हणजे मानवता वाचवणे. राजेश पांडे यांनी डॉ. लालबाबू गुप्ता यांच्या कार्याचे कौतुक केले आणि महाराष्ट्रातील प्रशासनाकडून त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

प्रणवानंद सरस्वती म्हणाले की, छठपूजेमध्ये शिस्त, संयम, समर्पण, पवित्रता पाळली जाते. डॉ.लालबाबू गुप्ता म्हणाले की, छठ पूजेच्या निमित्ताने देशातील नद्यांची स्वच्छता सप्ताह साजरा करण्याचे आवाहन पंतप्रधानांना केले.

# पुण्यात शिंदे गटाकडून बॅनरबाजी!

## उद्धवचा वाटा, महाराष्ट्राचा घाटा' म्हणत उद्धव ठाकरेंना लक्ष्य

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

महाराष्ट्रामधून वेदान्त – फॉक्सकॉन प्रकल्पानंतर 'टाटा एअरबस' प्रकल्प गुजरातला गेला आहे. यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून शिंदे – फडणवीस सरकारवर विरोधी पक्षातील नेत्यांनी आरोप करण्यास सुरुवात केली आहे.या सर्व राजकीय आरोप प्रत्यारोपा दरम्यान पुण्यातील फर्ग्युसन रोड, जंगली महाराज रोडवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेनेच्या युवा



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेनेच्या युवा सेनेमार्फत ठिकठिकाणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा एकेरी उल्लेख करणारे, 'उद्धवचा वाटा महाराष्ट्राचा घाटा' असे फ्लेक्स लावले आहेत.**

सेनेमार्फत ठिकठिकाणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा एकेरी उल्लेख करणारे, 'उद्धवचा वाटा महाराष्ट्राचा घाटा' असे फ्लेक्स लावले आहेत.

त्यावर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना. महाराष्ट्रामधून किती प्रकल्प कधी आणि कुठे गेले आहेत.त्या नावाची यादी प्रसिद्ध करून उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करण्यात आले आहे.हे फ्लेक्स शहरातील नागरिकाचे लक्ष्य वेधून घेत आहेत.

# पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांच्याकडे ग्रामीण पोलीस दलाची सूत्रे

## पोलीस अधीक्षकपदाचा पदभार पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी रविवारी स्वीकारला.

।पुणे। महाईन्यूज ।

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकपदाचा पदभार पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी रविवारी स्वीकारला.गोयल यांची पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर गोयल यांनी रविवारी (३० ऑक्टोबर) पोलीस अधीक्षकपदाचा पदभार स्वीकारला. मावळते पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख या वेळी उपस्थित होते. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी गोयल गडचिरोली पोलीस दलात अधीक्षक होते. गडचिरोलीत नक्षलवादी



कारवायांचा बिमोड करण्यासाठी गोयल यांनी प्रयत्न केले होते. नक्षलवादी चळवळीतील अनेकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले होते.आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गोयल यांना जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

# मोटारींच्या प्रतिमेट्रो उद्घाटनाच्या खर्चावरून महापालिका-महामेट्रो आमने-सामने

## रस्त्यांच्या कामांसाठी दोन कोटी ३३ लाख रुपयांचा खर्च महामेट्रोने द्यावा

।पुणे । महाईन्यूज ।

मेट्रोची काही अंतरावरील प्रवासी सेवा सुरू करताना उद्घाटन सोहळ्यासाठी मंडप व्यवस्था आणि रस्त्यांच्या कामांसाठी दोन कोटी ३३ लाख रुपयांचा खर्च महामेट्रोने द्यावा, अशी मागणी महापालिकेने महामेट्रोकडे केली आहे. मात्र महापालिकेनेच हा खर्च सोसावा, अशी भूमिका महामेट्रोने घेतला आहे. त्यामुळे उद्घाटन खर्चावरून महामेट्रो आणि महापालिका आमने-सामने आल्याचे चित्र आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गेल्या सहा मार्च रोजी मेट्रोची काही अंतरावरील प्रवासी सेवा सुरू करण्यात आली. काही अंतरावर प्रवासी सेवा सुरू असल्याने मेट्रोची सेवा चर्चेत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मेट्रोच्या प्रवासी सेवेचे उद्घाटन



होणार असल्याने गरवारे महाविद्यालय ते कोथरूड या दरम्यानच्या रस्त्याचे काम महापालिकेने करून घेतले. तसेच उद्घाटनस्थळी मोठा मंडप टाकण्यात आला होता. मंडप व्यवस्थाचा खर्च महापालिका आणि महामेट्रोने करायचा आणि मेट्रोचे काम करताना दुरवस्था झालेल्या कर्वे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जबाबदारी म्हणून महामेट्रोने घ्यावी, असा निर्णय झाला होता. त्यानुसार ही दोन्ही कामे महापालिकेने एका ठेकेदाराकडून करून घेतली होती. काम झाल्यानंतर कामापोटीची रक्कम ठेकेदाराने महापालिकेकडे मागितली आहे. त्यामुळे महापालिकेने महामेट्रोकडे पाच ते सहा वेळा पत्रव्यवहार केला

# करोना काळात जगभर क्षयरुग्णांच्या संख्येत वाढ

।पुणे। महाईन्यूज ।

**करोना काळात जगभरातील क्षयरुग्णांच्या संख्येत तब्बल साडेचार टक्के वाढ दिसून आली आहे. भारतात २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये १८ टक्के रुग्णवाढ झाली असून मृत्युसंख्येतील वाढही लक्षणीय आहे. जागतिक आरोग्य संघटनेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या क्षयरोग विषयक वार्षिक अहवालातून ही माहिती समोर आली आहे.**

सध्या जगभर दिसून येणाऱ्या



सर्वांत गंभीर आणि जीवघेण्या आजारांमध्ये क्षयरोगाचा दुसरा क्रमांक लागतो, संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या खोकल्यातून त्याचा प्रसार होतो. जागतिक आरोग्य संघटनेकडून क्षयरोग विषयक वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. करोना पूर्व आणि करोनानंतरच्या काळात क्षयरुग्णांच्या संख्येत दिसलेली वाढ लक्षणीय असल्याचे निरीक्षण या अहवालातून नोंदवण्यात आले आहे. क्षयरोगाने दगावणाऱ्या रुग्णांची संख्याही या काळात वाढल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२१ मध्ये आढळलेल्या नव्या रुग्णांमध्ये सुमारे ५६ टक्के पुरुष, ३२ टक्के महिला आणि ११ टक्के लहान मुलांचा समावेश आहे. या रुग्णांमध्ये क्षयाबरोबरच कुपोषण, धूम्रपान, मद्यपान, एचआयव्ही आणि मधुमेह यांपैकी काही त्रासही अस्तित्वात असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये झालेल्या साडेचार टक्के रुग्णवाढीनंतर जगभरामध्ये सुमारे एक कोटी नव्या क्षयरुग्णांची नोंद झाली आहे. सुमारे १० लाख रुग्णांचा क्षयरोगाने मृत्यू झाला आहे. औषध प्रतिरोधक क्षयरोगाच्या (ड्रग रेजिस्टंट टीबी) संख्येतही सुमारे तीन टक्के एवढी वाढ या काळात दिसून आल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातून समोर आले आहे.

जगाच्या कानाकोपऱ्यातील सर्व देशांमध्ये क्षयरोगाचे अस्तित्व असले, तरी ज्या ३० देशांमध्ये त्याचे प्रमाण सर्वाधिक आहे, त्या देशांमध्ये भारताचा समावेश असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातून समोर आले आहे. क्षयरोगाबाबत गैरसमज अधिक आहेत, मात्र ८५ टक्के रुग्ण चार ते सहा महिन्यांच्या उपचारांनी संपूर्ण क्षयरोगमुक्त होतात आणि औषधोपचार सुरू असताना त्यांच्याकडून इतरांना क्षयाचे संक्रमण होण्याचा धोका कमी होतो, असेही तज्ज्ञांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# पिंपरी-चिंचवडमध्ये छटपूजा उत्साहात!

## पवना काठावर गर्दी : दोन वर्षानंतर पहिल्यांदाच निर्बंधमुक्त उत्सव

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

कोरोना काळानंतर पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच चिंचवडगावातील पवना नदी घाटावर उत्तर भारतीयांचा छठपूजा उत्सव आज रविवारी (दि. ३०) रोजी भव्य प्रमाणात निर्बंधमुक्त साजरा करण्यात आला. या उत्सवात हजारो उत्तर भारतीय कुटुंबांनी भक्तिभावाने सुर्योपासना केली. या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन हनुमान मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले होते.

आज रविवारी (दि. ३०) रोजी सायंकाळी सूर्यास्ताच्या अगोदरच छटमाईची पूजा मांडून तिथे विधिवत पूजा करण्यात आली. या मांडणीमध्ये उसाला महत्व असते. चारही बाजूने ऊस पुळणीत रोवून उसाचा मांडव करून त्यामध्ये पाण्याने भरलेला कलश ठेऊन त्यावर दिवा पेटवला आणि त्यावर विटाची मांडणी करून पूजेची मांडणी केली. त्यासमोर खवा, गव्हाचं पीठ आणि तुपापासून बनवलेला प्रसाद आणि फळं यांचा नैवेद्य दाखविला आणि गाईच्या दुधाचे सूर्याचा अस्त होताना महिलांनी अर्ध्य दिले.

> **गेल्या २० ते २५ वर्षांपासून आम्ही या ठिकाणी छटपूजेचा उत्सव साजरा करत आहोत. येथील स्थानिकांचे देखील या उत्सवामध्ये आम्हाला चांगले सहकार्य लाभते. दोन दिवसांचा हा उत्सव असतो. आज षष्ठीला सूर्यास्ताच्या वेळेस सूर्याला अर्ध्य दिले जाते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्योदयाच्या वेळेस अर्ध्य दिले जाते. संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातून आमचे उत्तर भारतीय बांधव हा उत्सव साजरा करण्याकरीता पवना घाटावर जमतात. एकमेकांना शुभेच्छा देतात आणि समाजात सुख-शांती लाभो अशी प्रार्थना करतात.**
>
> **- विजय गुप्ता, अध्यक्ष, हनुमान मित्र मंडळ, कार्याध्यक्ष, छठ पूजा समिती.**

संस्कृती व निसर्गाचे रक्षण करणारा छटपूजा उत्सव उत्तर भारतात विशेषता: बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि नेपाळ लगत असणा-या प्रदेशात मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जातो. आपल्या कुटूंबाला सुख, समृध्दी, आरोग्य, ऐश्वर्य लाभावे यासाठी महिला सूर्याची उपासना म्हणून छटपुजेचे व्रत करतात. सर्व मनोकामना पूर्ण करणारे हे व्रत असल्याची प्राचिन काळापासूनची श्रध्दा आहे. निसर्गात आणि समाजात एकरूपता साधणाऱ्या या व्रतात, आस्था, प्रेम, विश्वास, त्याग आणि पर्यावरणाप्रती समर्पणाची भावना आहे. आयोजकांच्या वतीने पवना घाटावर भव्य गंगा आरती आणि पूजा, भजन, छट लोकगीत असे विविध धार्मिक, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आले होते. भाविकांच्या "जय छठमाता"च्या गजराने वातावरण प्रसन्न झाले होते. उद्या सोमवारी (दि. ३१) रोजी याच घाटावर सकाळी उगवत्या सूर्याची पूजा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक विजय गुप्ता यांनी दिली.

छठपूजा उत्सवात हनुमान मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा छठ पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता, जितेंद्र गुप्ता, देवानंद गुप्ता, शामसुंदर प्रसाद, उमाशंकर गुप्ता, अशोक गुप्ता, अभि पटेल, राजकुमार गुप्ता, अमित गुप्ता, मुन्नाप्रसाद गुप्ता, सामाजिक कार्यकर्ते खंडुशेठ चिंचवडे, हरेराम कुंभार, अनिल गुप्ता, भावेश गुप्ता आदींनी मोलाचे सहकार्य केले.

# 'आयआयबीएम'च्या प्रतिक्षा डफळ यांना 'लेडी सिंघम पुरस्कार'

## गुणवंतांचा गौरव : डॉ. धनंजय वर्णेकर, शितल वर्णेकर यांची उपस्थिती

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आयआयबीएम कॉलेज पुणेमधील प्रशासकीय प्रमुख कु. प्रतिक्षा डफळ यांना विद्यार्थी व पालकांच्या सिंघम पद्धतीने सर्व अडचणी दूर केल्याबद्दल लेडी सिंघम पुरस्कार देऊन संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर व सौ. शितलताई वर्णेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**



तसेच सहशिक्षक कु. प्रेरणा कणावजे, सचिन बरबडे, शाहाबाज काझी, मिलिंद उशीर यांना सर्वोत्कृष्ट पुरस्कार २०२२ प्रदान करीत गौरविण्यात आले व संस्थापकांनी त्यांना पुढील शुभेच्छा दिल्या.

कु. प्रतिक्षा डफळ यांनी विद्यार्थिनींबाबतीतले प्रश्न समजून विद्यार्थिनींनी न घाबरता संकटाना सामोरे कसे जावे, तसेच येणारी संकटे किती भयानक येतात, पण आपण न घाबरता, न खचता सिंघम पद्धतीने निर्णय व जिद्द ठेऊन यशस्वी झाले पाहिजे, असे विद्यार्थीना घडविण्याचे काम केले. तसेच आयआयबीएम संस्थेसाठी एकनिष्ठ व प्रामाणिकपणे काम करून संस्थेच्या प्रगतीबाबत, विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत असणाऱ्या जबाबदाऱ्या अतिशय प्रामाणिकपणे पूर्ण केल्या, त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

तसेच आयआयबीएम कॉलेजचे विभागप्रमुख अमोल भागवत यांनी प्रतिक्षा डफळ या खूप मेहनती व धाडसी प्रवृत्तीच्या आहेत. संस्थांमध्ये असणाऱ्या अडचणी एक मुलगी असून विद्यार्थी व पालकांच्या सर्व जबाबदाऱ्या सिंघम पद्धतीने पूर्ण केल्या.

त्यांना मिळालेला जो लेडी सिंघम पुरस्कार आहे, तो त्यांचा स्वकष्टाचा आहे, परंतु त्यांचे खरे सिंघम त्यांचे आई वडील हेच आहेत, असे संबोधले व पुरस्काराबद्दल आणि नवीन जबाबदार्यांबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य प्रदीप फुलकर, विभागप्रमुख अमोल भागवत, प्रो. अनिकेत वंजारी यांनीही उपस्थित राहत शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# श्रावणबाळाचा गुगली!

***चलनी नोटांवर गणपती आणि/वा लक्ष्मी यांच्या प्रतिमा छापण्याची मागणी करून 'आम आदमी पक्षा'चे अरविंद केजरीवाल यांनी सत्ताधारी भाजप तसेच समस्त राजकीय पक्षांची चांगलीच कोंडी केली असे म्हणावे लागेल.***

एकमेकांशी वाद सुरू असताना त्यातील एकाने अचानक दुसऱ्यास “तू हल्ली पत्नीस मारहाण करतोस का,” असा प्रश्न विचारून गांगरून टाकण्यासारखा हा प्रकार. या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देणे अशक्य. पण 'नाही' असे द्यावे तर त्यातून 'म्हणजे पूर्वी मारझोड करीत होतास' असा अर्थ निघण्याचा धोका. वादविवादात प्रतिस्पर्ध्यास अडचणीत आणणाऱ्या चतुर व्यक्तीसारखे केजरीवाल यांचे वर्तन असते. नोटांवर गणपती/लक्ष्मी यांच्या प्रतिमा छापण्याची त्यांची मागणी ही या माळेतली. ती उघड मान्य करणे अवघड. समजा भाजपने ती मान्य केलीच तरी त्या 'यशा'चे श्रेय 'आप'ला मिळणार. म्हणजे या देवतांच्या प्रतिमेचा भाजपच्या प्रतिभा-संवर्धनास काही उपयोग नाही. पण म्हणून उघडपणे ही मागणी फेटाळावी तर केजरीवाल पुन्हा भाजपच्या हिंदुत्वाबाबत प्रश्न उपस्थित करण्यास रिकामे. यांतील मधला मार्ग काढायचा तर मग केजरीवाल यांच्यावर अन्य काही आरोप करीत राहणे आवश्यक. या गणपती/लक्ष्मीच्या पेचात अडकलेली आपली मान सोडवण्यासाठी भाजप नेमके हेच करताना दिसतो. प्रचारकर्त्यांची, समाजमाध्यमी जल्पकांची तगडी फौज हाती असल्याने भाजपस या प्रयत्नात यश येईलही. पण इतके दिवस देवाधिदेवांचा आशीर्वाद ज्या भाजपस होता त्या भाजपकडून या देव-देवतांना आपल्याकडे वळवण्याचा 'आप'चा प्रयत्न चांगलाच यशस्वी ठरला हे भाजप समर्थकांसही नाकारता येणारे नाही. हा धडा आहे. धर्मादी मुद्दे राजकारणाच्या धबडग्यात किती आणावेत, खरे तर मुळात ते आणावेतच का हा यातील कळीचा मुद्दा. याचे कारण असे की बंद दरवाजाच्या आड सीमित राहायला हवेत असे विषय राजकारणाच्या चावडीवर एकदा का यायला सुरुवात झाली की 'आतले' आणि 'बाहेरचे' असे काही राहात नाही. सर्वच उघड्यावर येते. गेल्या काही निवडणुकांत याची प्रचीती येते. राहुल गांधी यांचे जानवे-दर्शन, केजरीवाल यांनी 'हनुमान चालीसा' मुखोद्गत असल्याचे दाखवून देणे, ममता बॅनर्जी यांनी देवी-पाठ म्हणून दाखवणे इत्यादी उद्योग यातूनच आले. बरे, या मंडळींना 'तसे' करायला लावले म्हणून भाजपने अभिमान मिरवायचा म्हटले तर त्यावर केजरीवाल यांची ही गणपती/लक्ष्मी मुद्रेची मागणी. यातून दिसते ते इतकेच की राजकारण एकदा का भावनेच्या प्रवाहात वाहू दिले की प्रवाहपतित होण्याखेरीज पर्याय राहात नाही. केजरीवाल यांनी गणपती/लक्ष्मीबाबत मागणी केल्या केल्या काँग्रेसचे मनीष तिवारी यांनी 'मग आंबेडकर यांची प्रतिमा का नाही' असा प्रश्न विचारला. तो अजिबात अवास्तव नाही.

## आनंदी सकाळ

### शिक्षण : काळाची गरज

भारतीय जीवनशास्त्र कर्मयोगाच्या पायावर उभे आहे. या कर्मयोगाचे संतुलित व परिपक्व विचार-विवेचन भगवद्गीतेत केले आहे. महर्षी व्यासांनी वेद पुराणाचा, सकल शास्त्रांचा गहन परामर्श घेऊन गीतेचे नवनीत काढले आहे. व्यासऋषी निर्माते, चिंतक, विचारक, द्रष्टा ऋषी होते. मानव अस्तित्वाचा, मानव-समाजाचा मानव-जीवनाचा, सर्वंकष अभ्यास चढत्या-उतरत्या श्रेणींच्या प्रवृत्तींसह अर्थात् उत्कर्षकारी- पतनगामी प्रवृत्तींसह व्यासांनी स्पष्टपणे, विशाल बुद्धीने ज्ञानदीप प्रज्वलीत करून महाकाव्य व वेदांत - ग्रंथात शब्दबद्ध केला आहे. व्यासांच्या कर्मयोगाचे संस्कृतीशी मिलन होऊन भारतीय माणसाची श्री जीवनशैली बनली आहे. या जीवनशैलीत राहणारा परंपरानुगामी भारतीय समाज बदलत्या काळानुसार नव्या समाजव्यवस्थेत समाधानी झाला नाही, तसेच नव्या प्रवाहाशी सुसंगत जीवन समाजातील सर्व घटकांना जगता आले नाही. त्याचा ताण ग्रामीण व शहरी जीवनावर मोठ्या प्रमाणात दिसून आला आहे.

# लोकांचे आर्थिक प्रश्न नजरेआडच?






भारताच्या सध्याच्या आर्थिक स्थितीविषयी भाष्य करणारा लेख लिहिण्यास कुणाही अभ्यासकाला सांगितले, तरी दोन महत्त्वाचे विषय त्या लेखात असतीलच.. बेरोजगारी आणि महागाई. कारण हेच दोन विषय, लोकांच्या रोजच्या जगण्याशीही निगडित आहेत.

पण याला ताजा अपवाद ठरले आहे, ते आपले सरकारी प्रकाशन! केंद्रीय अर्थखात्यामार्फत प्रकाशित होणारे 'मन्थली इकॉनॉमिक रिव्ह्यू' हे एरवी अभ्यासू नियतकालिक म्हणून ओळखले जाते; पण या नियतकालिकाच्या यंदाच्या अंकात भारताच्या सध्याच्या आर्थिक स्थितीविषयी भाष्य करणारा लेख लिहिणाऱ्या सहा तरुण आणि उत्साही अर्थशास्त्रज्ञांनी केवळ बेरोजगारी नव्हे तर कुपोषण, भूक, गरिबी यापैकी कशाचाही नामोल्लेखसुद्धा का केला नसावा? त्यांनी हे मुद्दाम केले, असे मी म्हणणार नाही (कदाचित त्यांच्या कानांत कुणी तरी पुटपुटले असावे की, 'आपले पंतप्रधान हा लेख वाचणार आहेत'). वास्तविक बेरोजगारी, कुपोषण, भूक आणि गरिबी यांचा अनुल्लेख करणे ही आजघडीला विद्वत्तेशीही प्रतारणा ठरते, हे त्या सहा जणांना माहीत असणारच.. पण ते याबद्दल काहीही कबूल करणार नाहीत.

'मन्थली इकॉनॉमिक रिव्ह्यू' हा एक महत्त्वाचा दस्तावेज असतो. यंदा २२ ऑक्टोबर २०२२ रोजी जो ताजा अंक प्रकाशित झाला, तो 'सप्टेंबर २०२२ 'चा आहे. हा आर्थिक वर्षाच्या सहामाहीनंतरचा (मार्च ते ऑगस्ट- २०२२ ) महत्त्वाचा अंक, त्यामुळे वर्षाच्या मध्यावर आपल्या अर्थव्यवस्थेची शक्तिस्थळे काय आणि कच्चे दुवे कोणते, यांचा नेमका आढावा घेऊन, अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी पुढल्या सहामाहीत तसेच त्यापुढल्या आर्थिक वर्षांत काय करावे लागेल, याचा ऊहापोह त्यातील अभ्यागत अर्थशास्त्रज्ञांच्या लेखाद्वारे अपेक्षित होता. अर्थव्यवस्थेपुढील धोके नेमक्या शब्दांत सांगणे, जागतिक कल ओळखणे आणि त्याचा काय परिणाम भारतावर होणार हे जोखणे हे अर्थशास्त्रज्ञांचे कामच असते.

पण सप्टेंबरच्या अंकात तसे काही झालेले नाही. हा अंक पातळसा ३३ पानी आहे आणि त्यात बरेच आलेख, तक्ते तसेच तीन पाने भरून आकडेवारी आहे. अभ्यागत अर्थशास्त्रज्ञांचा लेख अन्य पानांवर आहे. सहा भागांचा ऊहापोह, निष्कर्षांचा सारांश आणि मग दिशादर्शन असा या लेखाचा बाज आहे. यापैकी 'सहा भाग' हा मुख्य मजकूर, त्यातून सरकारच्या चिंतेचे विषय दिसून येतात : (१) राजकोषीय स्थिती, (२) उद्योग, (३) सेवा क्षेत्र, (४) पत-मागणी, (५) चलनवाढ आणि (६) बाह्य क्षेत्र. यातून आपण अशी अटकळ बांधायची की बेरोजगारी, कुपोषण, भूक आणि गरिबी हे 'सरकारच्या चिंतेचे विषय' नसावेत.

या एकंदर अहवालवजा लेखाचा सूर स्वतःचेच अभिनंदन करण्याचा आहे. हा आत्मश्लाघेचा सूर आणि लेखाचा नूर अखेरच्या वाक्यातून तर फारच स्पष्ट होतो.

# स्वप्नांच्या मागोव्याची गोष्ट

**स्वप्नपूर्तीचा हा मानवी अस्तित्वाचा अविभाज्य भाग. प्रत्येक व्यक्ती निरपवादपणे स्वप्ने बघत असली, तरी स्वप्नपूर्तीचा आनंद त्यातल्या काहींनाच लाभतो.**

मग इतरांना त्यांच्या स्वप्नांची ओळख करून देऊन, स्वप्नपूर्तीचा पाठपुरावा करण्यासाठी वाट दाखवणारे मात्र अपवादानेच असतात. स्वप्नांच्या अशा मागोव्याची सिनेमाच्या शैलीतली गोष्ट लेखक तन्वीर सिद्दीकी यांनी त्यांच्या 'फाइव्ह फोर थ्री टू वन' या पुस्तकात सांगितली आहे. मात्र पुस्तकातल्या चांगल्या विषयाला लेखक आणि प्रकाशक दोघांनी न्याय दिलेला नाही, असे लक्षात येते.




प्रत्येकजण स्वप्न पाहतो! पण 'तो' एक पाऊल पुढे गेला आहे... त्याने लोकांना स्वप्ने दाखवली आहेत..! आणि ती खरी होतील, याची खात्री आहे. एका सामान्य माणसाची गोष्ट.. .. एका विलक्षण मिशनसह.. त्या स्वप्नपूर्तीसाठी त्याने शनायाला निवडले.. पण पुढच्या वेळी, तिच्याऐवजी कदाचित तुम्ही असाल! किंवा तो 'तुम्ही' असू शकाल', अशा काहीशा आव्हानासह लिहिलेल्या कथेविषयी उत्सुकता वाटते. पण कादंबरीच्या थंड सुरुवातीने आणि बराच वेळ वेग न धरल्याने आपणही मनातल्या मनात आकडेमोड करत राहतो. कथा तरुणाईची असल्याने तिची भाषा वेगळी आहे, हे मांडण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही ते विषयाला अनुरूप नाहीच असेच वाटून जाते.

'फाइव्ह फोर थ्री टू वन' ही वेगवेगळ्या शहरांत-राज्यांतील सहा व्यक्तींच्या स्वप्नांची गोष्ट आहे. या सहा जणांच्या आपल्या आयुष्याविषयीच्या स्वप्नांचा- नेमकेपणाने सांगायचे तर करिअरविषयीच्या स्वप्नांचा- आणि त्या स्वप्नांचा कोणा त्रयस्थ व्यक्तीच्या मदतीने मागोवा घेण्याचा शोध लेखकाने मांडला आहे. एका अ‍ॅपच्या निमित्ताने हे सर्व जण एकमेकांशी जोडले जातात आणि या त्यांच्या गोष्टी एकमेकांमध्ये गुंततात. या सहाजणांपैकी एक, शनाया नकोशा नोकरीला तडकाफडकी रामराम ठोकून घरी परतते, त्यानंतर इंटरनेटवरच्या महाजालावरच्या एका त्रयस्थ व्यक्तीच्या- शक्तीच्या प्रोत्साहनानंतर आपल्या स्वप्नाचा माग घेण्यासाठी लेखणी हाती घेते. ही गोष्ट पूर्ण करण्याच्या निमित्ताने तिला वेगवेगळे लोक भेटतात. यात, छायाचित्रकार होऊ इच्छिणारा पण अकाउंटंटचे काम करणारा फैयाझ असतो, पालकांनी इंजिनीअर होण्यास मनाई केलेला वंदन असतो, शिक्षकी पेशाची आवड असतानाही डॉक्टरीकडे वळलेला त्रिभुवन, असे इतरही काही जण असतात. या सर्वांची गोष्ट आणि स्वप्नांना बळ देणाऱ्या त्या नाव असूनही अनाम व्यक्तीचा शोध बरोबरीने पुढे सरकत राहतो. हा प्रवास सुरुवातीला काहीसा संथ आहे. तर नंतर त्यातल्या पात्रांच्या दिशा समजण्यास काही पाने खर्ची पडली आहेत. एखाद्या प्रसंग, पात्रांचा मनोव्यापार कळण्यासाठी हा विस्तार करण्यात आलेला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# टाटा-एअरबस'नंतर आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर?

## 1185 कोटींची गुंतवणूक असलेला प्रकल्प नागपुरातून हैदराबादला, 600 जणांचा रोजगार गेला?

।मुंबई ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'टाटा-एअरबस' प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर राज्यात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या जात आहेत. त्यातच आता आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याची माहिती मिळत आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागपूरच्या मिहानमध्ये होणारा सॅफ्रन कंपनीचा प्रकल्प हैदराबादला गेल्याचं वृत्त 'एबीपी माझा'ने दिलं आहे. त्यामुळे 'वेदांता फायरफॉक्स' आणि 'टाटा-एअरबस' यानंतर आता आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याने सत्ताधारी-विरोधकांमधील वाद चिघळण्याची शक्यता आहे.**



सॅफ्रन ग्रुप मिहानमध्ये ११८५ कोटींची गुंतवणूक करण्यास उत्सुक होता. विमान तसंच रॉकेट इंजिन बनवणाऱ्या या कंपनीने मात्र आता महाराष्ट्रातून माघार घेतली असल्याची माहिती मिळत आहे. हा प्रकल्प आता हैदराबादला गेला आहे. जागा मिळण्यास उशीर झाल्याने प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याची माहिती मिळत आहे. या प्रकल्पामुळे ५०० ते ६०० कामगारांच्या हाताला रोजगार मिळणार होता. उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून स्पष्टीकरण –

सॅफ्रन प्रकल्प हैदराबादेत गेला आणि आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राच्या हातून गेला, अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. पण, वस्तुतः मार्च २०२१ मध्ये सॅफ्रनची हैदराबादेत फॅक्टरी तयार झाली आणि ८ जुलै २०२२ मध्ये त्याचा शुभारंभ झाला असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आलं आहे. हा प्रकल्प महाविकास आघाडीच्या काळातच हैदराबादमध्ये गेल्याचा दावा केला आहे.

**आरोप-प्रत्यारोपाला सुरुवात**

"सत्तेच्या हव्यासापोटी भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांनी राजकीय वातावरण अस्थिर केलं आहे. २०१४ नंतर महाराष्ट्रावर वक्रदृष्टी का पडत आहे?," अशी विचारणा काँग्रेस नेते अतुल लोंढे यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना केली आहे. "वेगळ्या विदर्भाच्या नावावर सत्तेत आलेले हे नेते, विदर्भावर आणि तरुणांवर अन्याय करत आहेत," अशी टीका त्यांनी केली आहे. "महाराष्ट्रात पायाभूत सुविधा, पाण्याची उपलब्धता आणि कुशल कामगार आहेत, तरीही प्रकल्प जाणं हा राजकीय करंटेपणा आहे.

### भाजपाकडून महाविकास आघाडीवर खापर

"महाविकास आघाडी आणि घरात दाराला आतून कडी लावून बसलेले मुख्यमंत्री यांच्यामुळे हे प्रकल्प महाराष्ट्रातून गेले. यांच्या कालखंडात केंद्र सरकारने हे प्रकल्प निर्माण केले होते. दोन्ही वेळी याआधीच्या राज्य सरकारने कोणतीही पावलं उचलली नाहीत. आता शिंदे-फडणवीस सरकारवर खापर फोडण्याचा निंदनीय प्रयत्न सुरु आहे," अशी टीका भाजपा नेते अतुल भातखळकर यांनी केली आहे. महाराष्ट्रात आगामी काळात मोठ्या प्रमाणात प्रकल्प येतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

"तीन महिने कोणत्याही कंपनीला जमीन मिळत नाही. याचा अर्थ त्यांनी वर्षभरापूर्वी अर्ज केला असणार. एमआयडीसी किंवा मिहानमध्ये त्यांना जमीन मिळाली नसेल. या प्रकल्पांची घोषणा दोन वर्षांपूर्वी झाली होती. पण मागील सरकारने मंत्रीमंडळ बैठकीत ठरावही संमत केला नाही," असा आरोप अतुल भातखळकर यांनी केला आहे.

### आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

"भाजपाला आरोप करण्यापलीकडे काही येत नाही. महाविकास आघाडीमुळे करोना आला आणि देशाची वाताहत झाली इतकंच म्हणणं आता बाकी आहे," असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे महेश तपासे यांनी लगावला आहे.अतुल भातखळकरांना प्रत्युत्तर देताना ते म्हणाले की "२०२० पासून तुम्ही सरकारला बदनाम करण्याची भूमिका घेतली आहे. जे काही होईल त्याला महाविकास आघाडी, उद्धव ठाकरे, शरद पवार जबाबदार आहेत, असा एकमेव फालतू आरोप करण्यापलीकडे भाजपाला काही येत नाही. महाराष्ट्राची वाताहत होण्यासाठी, बदनाम करण्यासाठी एकमेव भाजपा जबाबदार आहे". "प्रकल्प गेल्यानंतर गुजरात पाकिस्तान आहे का? असं तुमचे नेतेच म्हणाले. सध्याच्या सरकावर उद्योजकच नव्हे तर शेतकऱ्याचाही विश्वास नाही," अशी टीका यावेळी त्यांनी केली.

---

# मुंबई ते अलिबाग प्रवास आता केवळ ४० मिनिटांत

## मुंबई ते मांडवा वॉटर टॅक्सी सेवा मंगळवारपासून होणार सुरू

।मुंबई । महाईन्यूज ।

**पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र असलेल्या अलिबागला मुंबईहुन केवळ ४० मिनिटांत पोहचणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुंबई क्रूझ टर्मिनल ते मांडवा वॉटर टॅक्सी सेवा १ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून मुंबई-मांडवादरम्यान २०० प्रवासी क्षमतेची वॉटर टॅक्सी धावणार आहे.**



मुंबईहून अलिबागला जाण्यासाठी सध्या भाऊचा धक्का येथून रो रो सेवा सुरू आहे. रो रोने अलिबागला पोहचण्यासाठी ६० ते ७० मिनिटे लागतात. मात्र हा प्रवास आणखी जलद गतीने पार करण्यासाठी वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा निर्णय सागरी मंडळाने घेतला. त्यानुसार १ नोव्हेंबरपासून ही सेवा सुरू होणार असल्याची माहिती सागरी मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या सेवेसाठी प्रवाशांना ४०० आणि ४५० रुपये मोजावे लागणार आहेत. पूर्णतः वातानुकूलित अशा या टॅक्सीच्या ६ फेऱ्या दिवसाला होणार आहेत. दरम्यान बेलापूर ते गेट वे ऑफ इंडिया अशी वॉटर टॅक्सी सेवा लवकरच सुरू होणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.


मुंबई क्रूझ टर्मिनल येथून सकाळी १०.३० वाजता, दुपारी १२.५० वाजता आणि दुपारी ३.१० वाजता बोट सुटेल. मांडवा येथून दुपारी ११.४० वाजता, दुपारी २.०० वाजता आणि दुपारी ४.२० मिनिटांनी बोट सुटेल.

---

# सातारा-पुणे महामार्गा वाहनांच्या गर्दीने हाऊसफुल्ल

।वाई । महाईन्यूज ।

दिवाळीच्या सुट्टीत गावी आलेले चाकरमानी पुण्या मुंबईच्या परतीच्या प्रवासाला लागल्याने सातारा-पुणे महामार्ग वाहनांच्या गर्दीने हाऊसफुल्ल झाला. महामार्गावर अनेक किमींच्या रांगा लागल्याने वाहतूक संथ गतीने सुरु होती.साताऱ्यातील सर्व बस स्थानकावरही तुडूंब गर्दी होती.पर्यटक पुन्हा घराकडे वळाल्याने महाबळेश्वर सुरुर रस्ता व पसरणी घाट व खंबाटकी घाट रस्त्यावर,आनेवाडी टोल नाक्यावर वाहनांच्या दोन्ही मार्गावर मोठ्या रांगा लागल्या होत्या.दिवाळीच्या सलग सुट्ट्या संपल्याने पुणे-बंगळूर महामार्गावर कराड, सातारा खंबाटकी घाट,शिरवळ परिसरात वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे झालेल्या वाहतूक कोंडीमुळे वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.



आनेवाडी टोल नाक्यावर वाहनांच्या दहा किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या होत्या. महामार्गावर मोठी गर्दी होती. खड्ड्यात हरवलेल्या महामार्गावरून व सेवा रस्त्यावरून वाट शोधताना वाहनचालकांची त्रेधातिरपीट उडाली.वेळे परिसरात खंबाटकी बोगद्यातून जाणाऱ्या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात खड्डे पडले आहेत. पाऊस जास्त प्रमाणात झाल्याने या बोगद्यातून पाण्याचे पाट वाहू लागले आहेत. यामुळेच या बोगद्यातून जाताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. परिणामी महामार्गावर वाहनांची गर्दी वाढून वाहतूक कोंडी झाली होती.खंबाटकी बोगद्यात पडलेल्या खड्ड्यांमुळे रविवारी वेळे येथील महामार्गावर दुपारपासूनच भल्या मोठ्या वाहनांच्या रांगा लागायला सुरुवात झाली. या रांगा जवळपास तीन ते चार किलोमीटर पर्यंत वाढल्या होत्या. कासव गतीने बोगद्यातून वाहतूक होत होती. महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या. त्यामुळे परतीच्या मार्गावर असलेल्या चाकरमान्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. तर काही वाहने बंद पडू लागल्याने वाहतूक कोंडीत आणखीच भर पडत होती.

# गुजरातमध्ये झुलता पूल नदीत कोसळला!

## मृतांचा आकडा 60 वर, अनेकजण जखमी

।मुंबई।महाईन्यूज। प्रतिनिधी।

**गुजरातमधील मोरबी याठिकाणी मोठी दुर्घटना घडली आहे. येथील मच्छु नदीवरील झुलता पूल पाण्यात कोसळला आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत जवळपास ६० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर अनेकजण जखमी झाल्याचं स्थानिक रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. ही दुर्घटना घडताच बचाव दल घटनास्थळी दाखल झाले असून बचाव कार्य सुरू आहे. जखमींना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी रुग्णवाहिकाही तैनात करण्यात आल्या आहेत.**

गुजरातचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बचाव दलाने आतापर्यंत सुमारे ७० हून अधिक लोकांना पाण्यातून बाहेर काढलं आहे. संबंधित जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर काहींची प्राथमिक तपासणी करून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. विशेष म्हणजे पाच दिवसांपूर्वी या पुलाची डागडुजी करण्यात आली होती. घटनास्थळी उपस्थित असणारे राज्याचे पंचायत मंत्री ब्रिजेश मेरजा यांनी 'एएनआय' वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार, गुजरातमध्ये रविवारी



संध्याकाळी पावणे सात वाजता मोरबी येथील झुलता पूल नदीत कोसळून ६० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. सध्या १७ लोक रुग्णालयात दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी आपले सर्व कार्यक्रम रद्द करून घटनास्थळी रवाना झाले आहेत. अलीकडेच या दुर्दैवी घटनेत ३५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र, हा आकडा वाढला असून मृतांची संख्या ६० वर पोहेचली आहे. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करून तातडीची मदत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तर गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी ट्वीट करत शोक व्यक्त केला आहे. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना ४ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत करण्याची घोषणा गुजरात सरकारने केली आहे.

# जम्मू काश्मीरातील जलविद्युत प्रकल्पात दरड कोसळली

## चौघांचा मृत्यू, सहाजण जखमी

।मुंबई।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

जम्मू काश्मीरच्या किश्तवार जिल्ह्यामध्ये दरड कोसळल्यानं झालेल्या अपघातात चारजणांचा मृत्यू झाला आहे. 'रॅटल' जलविद्युत प्रकल्पात ही दूर्घटना घडली आहे. या घटनेत सहा लोक गंभीररित्या जखमी झाले आहेत. जलविदयुत प्रकल्पातील बचावकार्य पूर्ण झालं आहे. या परिसरात चार जणांचे मृतदेह सापडले आहेत. सहा जखमी लोकांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात यश आलं आहे", अशी माहिती किश्तवारचे उपायुक्त देवांश यादव यांनी दिली आहे. दरम्यान,



बचावकार्यासाठी पाठवण्यात आलेले सहा जणांचे पथक ढिगाऱ्याखाली अडकले होते, अशी माहिती केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र शर्मा यांनी दिली आहे. 'रॅटल' जलविद्युत प्रकल्प हा चिनाब नदीवरील प्रस्तावित प्रकल्प आहे. नोव्हेंबर २०१८ मध्ये या प्रकल्पाची अंदाजित किंमत पाच हजार २०० कोटी होती. या प्रकल्पासाठी अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकामाचं कंत्राट १८ सप्टेंबरला देण्यात आलं आहे.

# बगदादमधील फुटबॉल स्टेडियमजवळ स्फोट!

## 10 जणांचा मृत्यू, 20 जखमी

।शांघाय। महाईन्यूज।वृत्तसंस्था।

इराकच्या पूर्व बगदादमध्ये झालेल्या स्फोटात दहा लोकांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत २० पेक्षा जास्त लोक जखमी झाल्याची माहिती सुरक्षा आणि वैद्यकीय क्षेत्रातील सूत्रांनी दिली आहे. फुटबॉल स्टेडियमजवळ असलेल्या गॅरेजमध्ये आणि एका टँकरमध्ये हे स्फोट झाले आहेत. ही स्फोटकं गॅरेजमधील एका गाडीला बांधण्यात आली होती. या गाडीत झालेल्या स्फोटामुळं जवळच असलेल्या गॅस टँकरमध्येदेखील स्फोट झाला, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या स्फोटात बळी पडलेल्यांपैकी बहुतेकजण स्टेडियममध्ये फुटबॉल खेळणारे खेळाडू होते. या स्फोटाच्या कारणांचा तपास सुरक्षा दलाकडून करण्यात येत आहे, असे एका निवेदनात लष्करानं म्हटलं आहे.



# फिलिपाईन्समध्ये वादळाचे ४७ बळी, ६० जण बेपत्ता

।नवी दिल्ली।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

फिलिपाईन्समध्ये उष्णकटिबंधीय वादळ 'नाल्गा'मुळे झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक आलेला पूर आणि भूस्खलनामुळे ४७ जण मृत्युमुखी पडले. फिलिपाईन्सच्या दक्षिण भागास मोठा फटका बसला. अद्याप सुमारे ६० ग्रामस्थ बेपत्ता झाल्याची भीती



आहे. भूस्खलनामुळे खडक, झाडे व मातीच्या ढिगाऱ्यात ते गाडले गेल्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

गुरुवारी रात्री ते शुक्रवार पहाटेपर्यंत मागुइंदानाओ प्रांतातील तीन शहरांमध्ये पुरात किमान ४२ जण बुडाले. यापैकी काही जण चिखल-दलदलीत सापडले, असे पाच प्रांतांच्या मुस्लीम स्वायत्त प्रदेशाचे अंतर्गत मंत्री नागुइब सिनारिम्बो यांनी सांगितले. हे वादळ शनिवारी पहाटे पूर्व भागात कॅमेरिन्स सूर प्रांतात धडकले.

# युक्रेन धान्य निर्यात कराराला रशियाची स्थगिती

**एपी, कीव्ह (युक्रेन)** : क्रिमियामधील सेवास्टोपोलमध्ये युद्धनौकांवर युक्रेनने ड्रोनद्वारे हल्ला केल्याचा आरोप करत रशियाने 'युक्रेन धान्य निर्यात करारा'ला स्थगिती दिली आहे. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरेस यांच्या मध्यस्थीनंतर युरोपसह जगभरात धान्यटंचाई होऊ नये, यासाठी हा करार अस्तित्वात आला होता.

रशियाने हल्ल्याचे निमित्त करून करारास स्थगिती दिल्यामुळे रशियातून युरोपला होणाऱ्या धान्यनिर्यातीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दुसरीकडे युक्रेनने मात्र या कथित हल्ल्याचा इन्कार केला असून रशियाच्या सैनिकांकडून स्फोटके हाताळताना चूक झाल्यामुळे युद्धनौकेवर स्फोट झाल्याचा दावा केला आहे.




# हॅलोवीन पार्टीसाठी अनन्याने केला बेबोसारखा लूक

बॉलिवूडमधील स्टार किड्स चित्रपटांमुळे चर्चेत होते मात्र आता बॉलिवूड पार्टींमध्ये ते दिसू लागल्याने सध्या सोशल मीडियावर त्यांची चर्चा सुरु आहे. बॉलिवूड स्टार किड्स कायमच नेटकाऱ्यांच्या रडारवर असतात त्यातील एक नाव म्हणजे अनन्या पांडे. अनन्याने चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवल्यापासून तिच्याकडे अनेक चित्रपटांच्या ऑफर्स येत होत्या. परंतु तिने काम केलेला एकही चित्रपट फारशी चांगली कामगिरी करू शकला नाही. तर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला तिचा 'लाइगर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच आपटला.

# मसाज करायला गेली, गोत्यात आली!

बॉलीवूडमधील प्रसिद्ध सेलिब्रेटी कश्मिरा शहा ही तिच्या हटकेपणाबद्दल नेहमीच चर्चेत असणारी अभिनेत्री आहे. वादग्रस्त वक्तव्यं करणं, कुणाबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करणे यामुळे ती अनेकदा नेटकऱ्यांच्या रडारवर आली आहे. सोशल मीडियावर सतत ॲक्टिव्ह असणाऱ्या कश्मिरानं आपल्या अनोख्या अंदाजानं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

आता तिच्या व्हायरल झालेल्या एका व्हिडिओनं वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. मसाजसाठी गेलेल्या कश्मिराला आपल्या सुटकेसाठी मदतीची याचना करावी लागली आहे. व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओमध्ये कश्मिरा जोरजोरानं ओरडताना दिसत आहे. तिनं आपल्या सुटकेसाठी लोकांकडे मदत मागितली आहे. बॉलीवूडमध्ये ग्लॅमरस लूक असणाऱ्या ज्या अभिनेत्री आहेत त्यात कश्मिराचेही नाव घ्यावे लागेल. या अभिनेत्रीनं केलेलं बोल्ड फोटोशुट हे नेटकऱ्यांना



आवडले आहे. यापूर्वी देखील तिनं कित्येकदा केलेल्या फोटोशुटची सोशल मीडियावर चर्चा झाली आहे. त्याचं झालं असं की, कश्मिरा ही मसाज करायला गेली पण तिथे जे झालं त्यामुळे तिला विनाकारण आणखी दुसऱ्या एका समस्येला सामोरं जावं लागलं आहे. त्या परिस्थितीतून सुटका करण्यासाठी तिनं मदतीचे आवाहन केले. मसाज सेंटरवर जे काही चालते त्याविषयीच्या अनेक बातम्या आपण सोशल मीडियावर वाचत असतो. पोलिसांकडून देखील अशा प्रकारच्या मसाज सेंटरवर छापा टाकल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. आता त्यात कश्मिराला आलेल्या वेगळ्या अनुभवानं सगळ्याचे लक्ष वेधले गेले आहे. कश्मिराचा जो व्हिडिओ व्हायरल झाला आहे त्यामध्ये ती एका मसाज सेंटरमध्ये मसाज करण्यासाठी आली होती.

# ताज हॉटेलमध्ये बायकोला दिलं वाढदिवसाचं सरप्राईज



अभिनेता-दिग्दर्शक विराजस कुलकर्णीने बायकोला चक्क ताज हॉटेलमध्ये वाढदिवसाचं सरप्राईज दिलं. त्याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

अभिनेत्री शिवानी रांगोळे व मृणाल कुलकर्णी यांचा लेक विराजस कुलकर्णीचा विवाहसोहळा काही महिन्यांपूर्वी पार पडला. या दोघांचं एकमेकांवर असणारं प्रचंड प्रेम प्रत्येक व्हिडीओ तसेच त्यांच्या सोशल मीडिया पोस्टवरून दिसून येतं. २८ ऑक्टोबरला शिवानीचा वाढदिवस होता. तिच्या वाढदिवसानिमित्त कलाक्षेत्रामधील मंडळी तसेच घरातील मंडळींनीही तिला भरभरून शुभेच्छा दिल्या. लग्नानंतरचा तिचा हा पहिला वाढदिवस. हा वाढदिवस खास असावा म्हणून विराजसने तिला सरप्राईज दिलं. त्याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शिवानीसाठी तिच्या सासूबाई म्हणजेच मृणाल कुलकर्णी यांनी खास पोस्ट शेअर केली होती.

# लग्नानंतरही महिमा नव्हती खुश

परदेस' फेम अभिनेत्री महिमा चौधरी ही फार काळ बॉलीवुडमध्ये ॲक्टिव्ह नसली तरी तिच्या पर्सनल लाईफमुळे ती जास्त चर्चेत राहिलेली अभिनेत्री आहे. वयाच्या ४९ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या अभिनेत्रीची लव केमिस्ट्री फारच क्लिश्ट होती. एके काळी लोकप्रिय असणारी ही अभिनेत्री स्वतःच्या लग्नात नाराज होती अशी चर्चा होती. त्यामागचं नेमकं खरं कारण काय ते जाणून घेऊया. अभिनेत्री महिमाचं अफेयर एके काळी टेनिस खेळाडू लिएंडर पेससोबत सुरू होतं अशी चर्चा होती. मात्र रिया पल्लईमुळे या दोघांच्या नात्यात दुरावा आला. नंतर २००६ मध्ये त्यांचं लग्न बिजनेसमॅन बॉबी मुखर्जीशी झालं. मात्र हे नातंही जास्त काळ टिकलं नाही. आयुष्यात आलेत बरेच चढउतार

२०२१ मध्ये माध्यमांशी बोलताना महिमाने तिच्या पर्सनल आयुष्यातील काही गंभीर किस्से शेअर केलेत. त्यातील एका घटनेचा परिणाम थेट तिच्या करियरवर झाला. याबरोबरच लग्नानंतरच्या अडचणी आणि दोनदा झालेले गर्भपात यावरही तिने भाष्य केले.



# प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्याची लगीनघाई, मोजक्या पाहुण्यांच्या उपस्थिती



गेल्या काही दिवसांपासून सिनेसृष्टीतील अनेक कलाकार विवाहबंधनात अडकत आहे. नयनतारा-विग्नेश शिवन, महालक्ष्मी-रविंद्र चंद्रशेखरन यानंतर आता आणखी एक दाक्षिणात्य अभिनेता लग्नबंधनात अडकला आहे. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता हरिश कल्याण याने नुकतंच लग्नगाठ बांधली. हरिश कल्याण याने प्रसिद्ध उद्योजक नर्मदा उदयकुमार हिच्याबरोबर सप्तपदी घेतली. अगदी मोजक्या पाहुण्यांच्या उपस्थितीत त्या दोघांचा विवाहसोहळा पार पडला. त्या दोघांच्या लग्नाचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील 'काधली' चित्रपट फेम अभिनेता हरिश कल्याण याच्या लग्नाचे अनेक फोटो सध्या समोर आले आहेत. हरिश कल्याण आणि नर्मदा उदयकुमार यांचा विवाहसोहळा अगदी पारंपारिक पद्धतीने पार पडला. यावेळी हरिश आणि त्याची पत्नी नर्मदा ही यांनी पांढऱ्या रंगाचे पारंपारिक कपडे परिधान केले होते. चेन्नईतील जीपीएन पॅलेस या ठिकाणी हा विवाहसोहळा संपन्न झाला. विशेष म्हणजे लग्नाच्या काही दिवस आधी हरिश कल्याणने एक पत्रकार परिषद घेतली होती. यात त्याने त्याच्या लग्नाबद्दलची माहिती दिली होती. यावेळी चाहत्यांना त्याचे लव्ह मॅरेज असल्याचे वाटले होते.

## शॉर्ट न्यूज »

### विराट कोहलीने अवघ्या १२ धावा काढून रचला विक्रम;

**। जळगाव। महाईन्यूज**

आज टी २० विश्वचषकात सुपर १२ च्या सामन्यांमध्ये भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पर्थमध्ये रंगला आहे. रोहित शर्मने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचे दोन्ही सलामीवीर म्हणजेच कर्णधार रोहित शर्मा व उपकर्णधार के. एल. राहुल स्वस्तात तंबूत परतले. रोहित झेलबाद झाल्यावर माजी कर्णधार व भारतातील सर्वोत्तम फॉर्ममध्ये असणारा विराट कोहली मैदानावर उतरला. आज पर्थच्या मैदानात विराट कोहलीने टी २० विश्वचषकातील सर्वात मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. विराट कोहली सुरुवातीच्या १२ च धावांमध्ये टी २० विश्वचषकात १००० धावा पूर्ण केल्या आहेत. मुख्य म्हणजे आपण टॉप ५ फलंदाजांची यादीत पाहिल्यास विराट कोहली यात सर्वात कमी सामने खेळूनही सर्वाधिक धावा करणारा फलंदाज दिसून येत आहे. टी २० विश्वचषकात आजवर विराट कोहलीने २१ सामने खेळले आहेत. आजचा भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामना कोहलीचा २१वा सामना आहे. सुरुवातीच्या ११ धावांमध्ये विराटने तीन चौकार मारले.

# मिलर- मार्करामची शानदार अर्धशतकं!

## दक्षिण आफ्रिकेने पाच गडी राखून केला भारताचा पराभव

**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रविवारी (३० ऑक्टोबर) रोजी ग्रुप बी मधील सामना झाला. टी२० विश्वचषक २०२२ मधील हा भारताचा तिसरा सामना होता. टी२० विश्वचषक २०२२ मधील हा ३० वा सामना असून पर्थ येथे भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला गेला आणि दक्षिण आफ्रिकेने तो सामना पाच गडी राखून जिंकला. या विजयाने आफ्रिका संघ उपांत्य फेरीच्या एक पाऊल अजून जवळ गेला आहे. एडन मार्कराम आणि डेव्हिड मिलरच्या दमदार भागीदारीने भारताला विजयापासून लांब नेले. सुर्यकुमार यादवची ६८ धावांची खेळी व्यर्थ गेली. लुंगी एनगिडीला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. टीम इंडियाने पहिल्या दहा षटकात शानदार गोलंदाजी केली. डावखुरा गोलंदाज अर्शदीप सिंगने दोन गडी झटपट बाद करत दक्षिण आफ्रिका संघाला अडचणीत आणले. पण त्यानंतर डेव्हिड मिलर आणि एडन मार्कराम यांनी शानदार अर्धशतके झळकावत दक्षिण आफ्रिकेला विजयाचा उंबरठ्यावर नेले. खराब चेंडूंचा समाचार घेत त्यांनी संघाला विजयाच्या जवळ नेले. यादरम्यान दोघांना टीम इंडियाने गचाळ क्षेत्ररक्षण करत दोन जीवदान देखील दिले. चौथ्या गड्यासाठी ७६ धावांची भागीदारी केल्यानंतर मार्कराम ५२ धावा करत बाद झाला. मार्कराम बाद झाल्यानंतर दुसऱ्या बाजूने खेळत असलेल्या मिलरने १८व्या षटकात अश्विनला दोन षटकार लगावत सामना दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने नेला.

# टीम इंडियाने सामना हारला तरी सुर्यकुमारने सर्वांची मने जिंकली

**।ओडेन्से। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

पर्थमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात चुरशीचा सामना होत आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने आफ्रिकन संघाला १३४ धावांचे लक्ष्य दिले आहे. या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवने ४० चेंडूत ६८ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ६ चौकार आणि ३ षटकार मारले. त्याचबरोबर सूर्यकुमार यादवच्या या खेळीनंतर पाकिस्तानी दिग्गजांनी त्याचे खूप कौतुक केले आहे.

सूर्याने मागील नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात २५ चेंडूत नाबाद ५१ धावांची अर्धशतकी खेळी साकारली होती. त्यानंतर त्याने पर्थ येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यातही अर्धशतकी खेळी केली. विशेष म्हणजे, या सामन्यात त्याने खास कारनामा केला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ६८ धावांच्या धडाकेबाज खेळीचे कौतुक करताना पाकिस्तानचा महान खेळाडू शोएब मलिक म्हणाला की "तो गोलंदाजाच्या डोक्यातील विचारांनी खेळू शकतो. गोलंदाज काय विचार करतो यावर तो फटके मारतो त्याला माहिती आहे की गोलंदाज कशाप्रकारचे चेंडू टाकणार आहेत." इथली परिस्थिती वेगळी आहे, इथे असे शॉट्स खेळायला मन लागते. शोएबने असेही म्हटले की, "जो फटके मारतो यष्टीरक्षकाच्या मागे खेळतो. त्याचं तंत्र इतकं चांगलं आहे की त्याला बाऊन्स नाही मिळालं तरी तो मागे खेळू शकतो." दुसरीकडे, पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि अनुभवी खेळाडू मिसबाह-उल-हकने सूर्यकुमार यादवचे कौतुक केले आणि म्हटले की, "गेल्या दोन सामन्यांमध्ये त्याने जे पाहिले आहे,




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000



महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही